भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ५८६/पोलीस अधिक्ष,क कार्यालय भंडारा, दिनांकः- ०२ /११/२०१८

## ''जादुटोण्याच्या संशयावरुन दुखापत करणाऱ्या आरोपीस २ वर्ष सश्रम कारावास द्रव्यदंडाची शिक्षा''

**पोलीस ठाणे पवनी** :– आरोपी नामे प्रफुल शांताराम देशमुख वय २५ वर्ष, रा.नवेगाव ( सांधु ) ता. उमरेड जि. नागपुर याने रत्नाकर माधुजी बाळबुधे वय ३५ वर्ष, रा. भुयार यास चाकुने मारुन दुखापत केल्याचा आरोप सिध्द् झाल्याने आज दिनांक १/११/२०१८ रोजी **मा. अतिरिक्त सत्र न्यायाधिश श्री. संजय भंसाली** भंडारा सा. यांनी आरोपीचे कृत्य व गुन्हयाची गंभिरता लक्षात घेवुन आरोपीस २ वर्ष सश्रम कारावास व २५००/–रू. दंड व दंड न भरल्यास १ महिना सश्रम कारावास शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहिती अशी आहे की, दिनांक ०१/०७/१३ ला तक्रारदार रत्नाकर माधुजी बाळबुधे वय ३५ वर्ष, रा. भुयार यांनी पोलीस ठाणे पवनी येथे येवुन तोंडी तक्रार दिली की, दिनांक ३०/०७/२०१३ रोजी ०७.३५ च्या सुमारास आपले सायकलने पराठीचे पिकाबाबत विचारपुस करणे करीता खपरी येथे जात असतांना डाबरी रोडाचे बाजुला खापरी मार्गे जाणाऱ्या पुलाजवळ प्रफुल शांताराम देशमुख हा आपले मोटार सायकलने माझे जवळ येवुन मला तु माझी बहीण हिला जादुटोणा केल्यास त्यामुळे ती मरण पावली असे म्हणुन माझे कॉलर पकडून चाकुने माझे गळयाजवळ, डोक्यामागे मानेजवळ, व डावे हातावर मारले. व जिवाने मारल्या शिवाय राहणार नाही अशी धमकी दिली. असे सांगीतल्या वरुन अपराध क्रमाक ८२/२०१३ कलम ३२६,५०६ भा.द.वी अन्वये गुन्हा नोंदवुन गुन्हयाची गांभिरता लक्षात घेवुन गुन्हयात ३०७ वाढ करण्यात आली. गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक पी. के. बोरकुटे यांनी सुरू केला.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक पी. के. बोरकुटे यांनी करून आरोपी नामे प्रफुल शांताराम देशमुख वय २५ वर्ष, रा. नवेगाव (सांधुत)ा ता.उमरेड जि. नागपुर यास अटक करून गुन्हयाचा तपास केला तपासात आरोपी विरूध्द् योग्य व सबळ पुरावे प्राप्त झाल्याने आरोपी विरूध्द् गुन्हयात कलम ३२६,३०७,५०६ भा.द.वी अन्वये पोलीस उपनिरीक्षक पी. के. बोरकुटे आरोपपत्र तयार करून सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले सदर आरोपपत्रास केस.क्र. ५५/१३ सदर गुन्हयाची सुनावणी **मा. अतिरिक्त सत्र न्यायाधिश श्री. संजय भंसाली** यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **अॅडव्होकेट दुर्गा तलमले, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन

साक्षदार तपासले, आज दिनांक ०१.११.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन आरोपी नामे प्रफुल शांताराम देशमुख वय २५ वर्ष, रा. नवेगाव (सांधु)ता. उमरेड जि. नागपुर यांचे विरूध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३२४ भादवि अन्वये २ वर्ष, सश्रम कारावास २५००/–रु दंड दंड न भरल्यास १ महिना सश्रम कारावास तसेच ५०६(२) मध्ये ६ महिणे सश्रम कारावास १०००/–रु. दंड दंड न भरल्यास १५ दिवसांचा सश्रम** कारावास, अशी शिक्षा सुनावण्यात आली. सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक चंद्रशेखर चकाटे ठाणेदार पवनी यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार चंद्रशेखर पटले पो.स्टे. पवनी यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

(जितेद्रं क्रे आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता